Shodhshauryam, International Scientific Refereed Research Journal
© 2019 SHISRRJ | Volume 2 | Issue 5 | ISSN : 2581- 6306

# भारताच्या भूक निर्देशांकाची स्थिती

**प्रा. डॉ. शिंदे एस. आर. (अर्थशास्त्र विभाग)**
**कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगांव ता.खटाव जी. सातारा**

**प्रस्तावना:**

भारत देशावर सातत्याने परकीय आक्रमण होत गेली. पर्शियन आक्रमणापासून मुगल, मंगोल, डच, पोर्तुगीज आणि ब्रिटिशांपर्यंत अनेकांनी भारतावर आक्रमण करून अनेक काळ भारतात वसाहती निर्माण केल्या आणि भारताला कंगाल गेले. कारण धर्माच्या कडक निर्बंधामुळे भारत अनेक जातीमध्ये विभागल्यामुळे आणि एक विशिष्ट जातच सैन्यामध्ये सामील होवू शकते आणि इतर दुसऱ्या जातीत कितीही बलवान, कुशल आणि निपुण युवक असला तरी त्यास सैन्यात समाविष्ट होता येत नव्हते, त्यामुळे भारत इतर विदेशी सैन्यबळाच्या तुलनेत कमकुवत झाला. सन १९४७ ला भारत जेंव्हा स्वतंत्र झाला तेंव्हा भारतीयांनी आपला स्वतचा विकास करण्याचा प्रयत्न चालू केला. परंतु भारतीय राजकर्त्यांकडून अजूनही पूर्ण कार्यक्षमतेने आत्मियतने कोणत्याही योजना राबवल्या नाहीत त्यामुळे देशाचा सर्वांगीण विकास झालेला नाही. त्यामुळे तुलनात्मक दृष्ट्या या देशातील मानवी विकास अजूनही झालेला नाही. देशाचा आर्थिक व सामाजिक विकास किती प्रमाणात झालेला आहे किंवा नाही यांचे मूल्यांकन करण्यासाठी भूक निर्देशांक अभ्यासला जातो. वर्तमान स्थितीत राष्ट्रीय उत्पन्नाचा हिस्सा समाजाच्या खालच्या स्थरापर्यंत पोहचलेला नाही. म्हणूनच देशातील बहुसंख्ये लोक उपासमारीच्या समस्याला तोंड देत आहेत. भारतात उपासमारीची समस्या किती तीव्र स्वरूपाची आहे आणि त्याचे स्वरूप कसे बदलत गेले याचे विश्लेषण करण्यासाठी ही संकल्पना अभ्यासणे गरजेचे आहे.

भारतीय लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात त्या लोकसंख्येचे पोषण योग्यरीतीने होत नसल्यामुळे अनेक लोकांना उपाशीपोटी रहावे लागत आहे. उदा. वाढत्या उत्पन्नाचा लाभ देशातील काही ठराविक लोकच घेत आहेत आणि बहुसंख्य लोक यापासून वंचित आहेत आणि ही स्थिती सातत्याने वाढत आहे.

**'भुक' म्हणजे काय?**

भूक किंवा उपासमारी म्हणजे व्यक्तीला निरोगी जीवन जगण्यासाठी ज्या किमान अन्न विषयक घटकांची गरज असते अशा घटकांच्या कमतरतेमुळे निर्माण होणारी स्थिती म्हणजे उपासमारी होय.

**उद्देश:**

१.जागतिक भूक निर्देशांकात भारताची स्थिती अभ्यासणे

२. भूक निर्देशनकाच्या क्रमवारीत भारत खालवलेल्या स्थितीत का आहे याचा अभ्यास करणे

३. भूक निर्देशांकाच्या क्रमवारीत सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविणे

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी दुय्यम साधनांचा आधार घेतलेला आहे. ज्यामध्ये इंटरनेटच्या माध्यमातून शासकीय अहवाल, कागदपत्रे, मासिके, संदर्भ पुस्तके इ. चा आधार घेऊन हे संशोधन लिखाण केले आहे.

Received : 01 Sep 2019 | Published : 15 Sep 2019 | September-October 2019 [ 2 (5) : 194-198 ]

**कालावधी**

प्रस्तुत संशोधन लिखाण पूर्ण करण्यासाठी सरासरी १० वर्षांचा कालावधी विचारात घेतला असून त्यासाठी २०१० ते २०२० या काळातील बदलांचा अभ्यास केलेला आहे.

**गृहीतकृत्य:**

**१. जागतिक भूक निर्देशांकांत भारताची स्थिति दैनिय आहे.**

**२. आणि ही दैनिय अवस्था कमी न होता वाढत आहे.**


जागतिक भूक निर्देशांक:

" जागतिक भूक निर्देशांक निश्चित करण्यासाठी ज्या घटकांचा आधार घेतला जातो त्यामध्ये **चार** निकष आधारभूत मानले जातात. यामध्ये कुपोषण, पाच वर्षांच्या खालील मुलांना त्यांच्या उंचीच्या तुलनेत किती कमी आहार मिळतो, पाच वर्षांच्या खालील किती मुलांची त्यांच्या वयाच्या तुलनेत उंची कमी आहे आणि दरहजारी आकड्यामागे पाच वर्षांखालील किती मुले दगावतात. या निकषांच्या आधारे जागतिक भूक निर्देशांकाची मांडणी केली जाते"

जागतिक पातळीवरील संस्थांच्या सामाजिक पाहणीवरून असे दिसून आले आहे की, भारतातील 74.1 टक्के लोकसंख्या सकस व पौष्टिक अन्न घेऊ शकत नाहीत. यांचे कारण म्हणजे सरकार याबाबत फारसे गंभीर नाही. अन्न विषय ज्या विविध योजना आहेत त्यावरील खर्च केंद्र सरकार कमी करत आहे. उदा. मध्यान्ह भोजन योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान यासारख्या 'पोषण कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल मिशन इ. या योजनावरील खर्चाची तरतुदी 2020 च्या अर्थसंकल्पात एकूण रु. 2,76,885 कोटी राखून ठेवण्यात आले आहेत. हे मागील वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा 19% कमी असल्याचे दिसून येते. तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत मंजूर करण्यात आलेली महत्त्वपूर्ण अन्न अनुदान योजना भारताच्या 67% लोकसंख्येला अनुदानित अन्नधान्य वितरीत करते. 2019-20 च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत या योजनेच्या वाटपात 68,650 कोटी रुपये किंवा 37% कपात करण्यात आली आहे. ही फार मोठी शोकांतिका व हस्यस्पद बाब आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला पुरेसा अन्नधान्याचा पुरवठा होत नाही.


यामुळे वर्तमान काळात भारतातील उपासमारीची समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. जागतिक भूक निर्देशक अहवालात असे म्हटले आहे की, **भुकमरीची समस्या सोडवण्यामध्ये मनमोहनसिंह सरकारापेक्षा मोदी सरकार अपयशी ठरले आहे. गेल्या पांच वर्षात भारत भुकमरीच्या निर्देशांकामध्ये ५५ व्या स्थानावरून खाली घसरून १०३ व्या स्थानावर पोहचला आहे.**

भूक निर्देशांकात भारताची स्थिती बांग्लादेश, नेपाळ या शेजारी देशापेक्षा वाईट बनली आहे आणि ती सातत्याने वाईट बनत आहे. खालील स्तंभालेखातील आकडेवारी अभ्यासल्यास ही स्थिती लक्षात येते. **स्तंभालेख १. जागतिक भूक निर्देशांकात भारताची स्थिती** (२०१८)



वरील स्तंभलेखातील आकडेवारीवरून असे दिसून येते की, देशाच्या आर्थिक विकासाच्या वृध्दीबरोबर भुकेची समस्या कमी न होता वाढत आहे. मग आर्थिक विकासाचे लाभ कोणाला मिळत आहेत हा खूप मोठा प्रश्न निर्माण होतो. २०१४ मध्ये भारत जागतीक भूक निर्देशांकांत ५५ व्या स्थानावर होता तर २०१८ मध्ये तो १०३ वर पोहचला आहे जे गंभीर आहे. कोणतीही समस्या कमी होत गेली तर शासन चालवणारे कार्यक्षम मानले जातात, नाहीतर कुचकामी, नालायक, धूर्त आणि देशातील जनतेला लुबाडणारे लुटेरे मानले जातात आणि ते आजचे राजकर्ते आहेत असे सिध्द होते. त्यांना देशाच्या आणि जनतेच्या हिताचे काहीही देणेघेणे नाही. बस्स. स्वतचे आणि आपल्या अल्प समाजाचे हित झाले पाहिजे एवढाच स्वार्थ त्यांच्यापुढे आहे.

**२०१८ च्या जागतिक भूक निर्देशकांत (GHI) भारताची शेजारील देशांमधील स्थिती** स्तंभालेख २.




वरील स्तंभलेखातील आकडेवारी असे स्पष्ट करते की, भारताची शेजारील देशाच्या भूक संदर्भात वाईट स्थिती आहे. श्रीलंका,नेपाळ,बांग्लादेश याबाबतीत आपल्यापेक्षा चांगल्या स्थितीत आहेत. त्यामुळे देशातील लोकांचे आनंदी राहण्याचे प्रमाणही कमी होत आहे. **युनायटेड नेशन सस्टेनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कने प्रसिद्ध केलेल्या 'वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्ट २०१८' मध्ये भारताचे स्थान ११ अंकांनी घसरून १५६ देशांपैकी १३३ व्या स्थानावर आहे.** या अहवालामध्ये असेही म्हटले आहे की, भारतातील लोकांपेक्षा पाकिस्तान,चीन,नेपाळ,भुतान,बांग्लादेश श्रीलंका या देशातील लोक जास्त आनंदी राहतात. भारताच्या लोकशाही निर्देशांकाचा दर्जाही घासलेला आहे. २०१७ साली जाहीर केलेल्या जागतिक लोकशाही निर्देशांकात भारतीय लोकशाहीचा निर्देशांक १० अंकांनी घासरेला आहे.

**राज्य भूक निर्देशांक**

ज्याप्रमाणे देशाच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी देशाचा भूक निर्देशांक अभ्यासला जातो त्याचप्रमाणे राज्याच्या कामगीरीचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य भूक निर्देशांक हा महत्वाचा निकष विचारात घेतला जातो. या निकषांचा विचार केल्यास असे दिसून येते की, देशातील विभिन्न राज्यात भुकेची तीव्रता कमी अधिक आहे. भुकेच्या तिव्रतेवरून राज्याचे तीन गटात वर्गीकरण केले जाते. अ. साधारण भुकेचा निर्देशांक ब.मध्यम भूक निर्देशांक क. गंभीर भूक निर्देशांक. साधारण भूक निर्देशनकांत चंदीगड, सिक्कीम,पाँडेचरी आणि केरळ हे राज्य असून या राज्यात भुकेची समस्या किरकोळ स्वरूपाची आहे. मध्यम भूक निर्देशकांत मणिपूर, मिझोराम, पंजाब, दिल्ली, अरुणा-चाल प्रदेश, अंदमान आणि निकोबार आणि तामिळनाडू या राज्यांचा समावेश होतो. या राज्याचा भूक निर्देशांक राष्ट्रीय सरासरीपेक्षा २९.७ पेक्षा कमी आहे. गुजरात, उत्तर

प्रदेश, आसाम, ओडिशा, मध्य प्रदेश, त्रिपुरा आणि महाराष्ट्र हे राज्यांचा भूक निर्देशांक राष्ट्रीय सरासरी 29.7 च्या वर आहेत. या राज्यांची कामगिरी हैती, नायजर, लायबेरिया आणि सिएरा लिओन या आफ्रिकन राष्ट्रांसारखी आहे. थोडक्यात चंदीगडचा भूक निर्देशांकाचा सर्वात कमी १२ गुण आहेत तर बिहार या राज्याचा भूक निर्देशांक सर्वात जास्त गुण ३५.५ आहेत.

**जागतिक भूक निर्देशाकांच्या क्रमवारीत भारत खालावलेल्या स्थितीत का?**

जागतिक भूक निर्देशांकांतील भारताच्या क्रमवारीत जी घसरण झाली त्यावरून असे दिसून येते की, पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, अलीकडच्या काळात मोदी सरकार भारतीयांच्या भूक प्रश्नावर उपाय करण्यामध्ये पूर्णपणे अपयशी ठरली आहे. त्यामुळेच भारत जागतिक भूक निर्देशनकांत ५५ व्या स्थानावरून १०३ स्थानावर घासरलेला आहे. ही गंभीर बाब आहे. असे का होत आहे त्याची अनेक कारणे सांगता येतील. त्यातील काही महत्वाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. स्थूल देशांतर्गत उत्पन्नात वाढ होत असताना वाढत्या उत्पन्नाचा लाभ केवळ वरच्या १० टक्के लोकांच मिळत असून बाकीच्या बहुसंख्या लोकांना वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नापासून वंचित रहावे लागते त्यामुळे ते गरीब व मागासलेल्या स्थितीतच राहतात.
२. सातत्याने होणारी भाववाढ : भारतात विविध वस्तू वे सेवांच्या मागणीत वाढ झाल्यामुळे त्यांच्या किंमती सातत्याने वाढत आहेत. वाढलेल्या किंमती लोकांच्या क्रयशक्तीत घाट करीत आहेत. त्यामुळे लोकांना पोष्टीक व सकस आहार घेणे अवघड होत आहे. त्यामुळे देशातील बहुसंख्ये लोक भूक बळी व कुपोषित होतात.
३. देशात लोकसंख्या विस्फोटक पध्दतीने वाढत आहे. त्यामुळे वाढणाऱ्या लोकांच्या समस्याही वाढत आहेत.
४. नैसर्गिक आपत्ती: भारतामध्ये सातत्याने अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे महापूर येऊन देशातील साधनसंपतीचे अतोनात नुकसान होत आहे तर कधी भूकंपाचे धक्के कमी अधिक प्रमाणात येत आहेत. तर कधी माहामारी,अवर्षण इ. यासारख्या आपत्तीमुळे देश संकटात जात आहे त्यामुळे देशातील भुकबळींचे प्रमाण वाढून जागतील भूकनिर्देशाकांत भारत देश खालावलेल्या स्थितीत दिसून येत आहे.
त्याचप्रमाणे भ्रष्टाचार, राजकीय घटकात नैराश्य, जलसिंचनाचा अभाव, शिक्षण पध्दतीचा अभाव, वाढत्या लोकांना रोजगार न मिळणे इ. कारणांमुळे देशात भुकेच्या समस्या वाढत आहेत . त्यामुळे भारताची स्थिती भुकनिर्देशांक खालावलेल्या स्थितीत दिसून येत आहे.

**उपाययोजना :**

देशात दरडोई अन्नधान्याच्या वापरत वाढ व्हावी यासाठी शासनाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. अन्न सुरक्षितता मिळवून देण्यासाठी देशातील सरकारे प्रयत्न करीत आहेत. सार्वजनिक वितरण प्रणालीमार्फत ग्रामीण व शहरी भागातील गरीब लोकांना अनुदानित किंमतीला गहू व तांदळाचे वाटप केले जात आहे. जसे डिसेंबर 2000 अंत्योदय योजना लागू करून 2 रु. किलो गहू ते 3 रु. किलो तांदूळ दिले जाते. अशा प्रकारच्या अनेक शासकीय पातळीवरील उपाययोजना राबवल्या जात आहेत.
याशिवाय आंगणवाडी सेविकेमार्फत गावातील लहान मूलं आणि गर्भवती माता बाळांतीन माता तसेच कमकुवत तरुणी यांनाही पौष्टिक आहार देण्याचा प्रयत्न केली जातो. यामुळे भुकबळीची समस्या कमी होण्यास नक्कीच मदत होत आहे.
तसेच रोजगार पातळी वाढविणे, लोकांमध्ये उद्योगशीलता विकसित करणे, शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विकास करणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे देशाच्या समग्र राष्ट्रीय उत्पन्नाचे समान पद्धतीने वितरण करणे इ. मुळेही देशातील भुकबळीची समस्या कमी होवू शकते.
वरील स्तंभ क्र. १ मधील विश्लेषणावरून असे दिसून येते की, जागतिक भूक निर्देशांकांत भारताची स्थिति वाईट आहे आणि अशी वाईट स्थिती कमी न होता वाढत आहे. हे विधान संशोधकाने घेतलेल्या गृहितकृत्याची सत्यता पटवून देते.

**संदर्भ सूची :**

१. OP-Blogs While Malnutrition Rages, Nutrition-Related Schemes Get 19% Less Funding Happy Pant13 February 2020)

२. https://www.cbgaindia.org/blog/malnutrition-rages-nutrition-related-schemes-get-19-less-funding

३. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन वेबसाईट

४. संयुक्त राष्ट्र संघटना- अन्न आणि कृषी संघटना २०१८-१९ चा अहवाल

५. आर्थिक पाहणी २०१९

६. महाराष्ट्राचे आंदजपत्रक २०१९

७. इंडियन इकॉनमी- एस. के. राय

८. जागतिकीकरण नवीन गुलामगिरी - विष्णू भागवत

९. भारतीय अर्थव्यवस्था- रमेश सिंह

१०. भारतीय अर्थव्यवस्था- डॉ. मुलाणी एम. यु. भापकर बी. बी. , भोर बी. के.- कैलास पब्लिकेशन

११. दि टाइम्स ऑफ इंडिया- १३ ऑक्टो २०१६